Camlin KOKUYO

# KOKUYO CAMLIN LIMITED

**CIN:** L24223MH1946PLC005434
**Regd. Office:** 48/2, Hilton House, Central Road, MIDC, Andheri (E), Mumbai - 400 093
**Tel:** 91-022-66557000 **Fax:** 91-022-28366579
**E-mail:** investorrelations@kokuyocamlin.com **Website:** www.kokuyocamlin.com

## NOTICE OF ANNUAL GENERAL MEETING

Notice is hereby given that the 73rd Annual General Meeting (AGM/e-AGM) of the Members of Kokuyo Camlin Limited ("the Company") will be held on Friday, September 4th, 2020 at 11.00 a.m. (IST) through Video Conferencing ("VC") Other Audio Visual Means ("OAVM") to transact the business as set out in the Notice of the AGM ("Notice").

In view of the spread of COVID-19 Pandemic, the Ministry of Corporate Affairs ("MCA") vide its circular No. 14/2020 dated April 8, 2020, No. 17/2020 dated April 13, 2020 and No. 20/2020 dated May 5, 2020 ("MCA Circulars") and Securities Exchange Board of India ("SEBI") vide its circular No. SEBI/HO/CFD/CMD1/CIR/P/2020/79 dated May 12, 2020 ("SEBI Circular"), allowed conducting the AGM through VC or OAVM.

The Notice along with the Annual Report for the financial year 2019-2020 ("Annual Report") will be sent to all the members of the Company on their registered e-mail address. The Members also note that the Notice and the Annual Report will be available at Investors section on the Company's website www.kokuyocamlin.com, on the website of the Stock Exchanges i.e. BSE Limited at www.bseindia.com and the National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com and on the website of National Securities Depository Limited at www.evoting.nsdl.com. The Members can attend the AGM through VC/OAVM facility only and view the live e-AGM at https://www.evoting.nsdl.com. The instructions for joining the e-AGM are provided in the Notice. The Members attending the AGM through VC/OAVM shall be counted for the purpose of quorum under Section 103 of the Companies Act, 2013.

Manners of registering/updating e-mail address: the login credentials for casting votes through remote e-voting are being sent to the members whose email address is registered with the Company/RTA/Depositories on their registered e-mail address. The same login credentials may also be used for attending the AGM through VC/OAVM or voting during the AGM.

The Members whose e-mail address is not registered, are requested to get the same registered/updated through the following procedure:

1. The Members holding shares in demat form can get their e-mail address registered by contacting their respective Depository Participant.
2. The Members holding shares in physical form may register their e-mail address and mobile number with Link Intime India Pvt. Ltd., Registrar and Transfer Agent (RTA) by sending an e-mail request at the email address rnt.helpdesk@linkintime.co.in or investorrelations@kokuyocamlin.com alongwith signed scanned copy of the request letter providing folio number, name of shareholder ,the email address, mobile number, self attested copy of Pan Card and Aadhar Card and copy of share certificate for registering their email address and receiving the annual report and the notice alongwith the e-voting instruction in electronic mode.

The Company is providing the members facility to cast their vote(s) on the business as set forth in the Notice through remote e-voting. The detailed procedure for casting vote(s) through remote e-voting is provided in the Notice. The said details will also be available on the website of the Company at www.kokuycamlin.com.

The login credentials for casting votes through remote e-voting shall be sent through e-mail to the Members on their registered email address. The Members who have not registered their e-mail address may generate login credentials by following the instructions given in the Notice.

The Members who had not cast their vote(s) through remote e-voting shall be eligible to cast their vote(s) through electronic voting system available during the e-AGM.

The Notice is being issued for the information and benefit of all the Members in compliance with the aforesaid MCA Circulars and SEBI Circular.

**FOR KOKUYO CAMLIN LIMITED**
**Sd/-**
**RAVINDRA V. DAMLE**
**VICE PRESIDENT (CORPORATE) & COMPANY SECRETARY**

Place : Mumbai
Date : 9th August 2020

Camlin
KOKUYO

# कोकुयो कॅम्लिन लिमिटेड

**CIN:** L24223MH1946PLC005434

**नोंदणीकृत कार्यालय:** हिल्टन हाऊस, ४८/२, सेंट्रल रोड, एम.आय.डी.सी., अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३. **टेलि:** ९१-२२-६६५५ ७०००, **फॅक्स:** ९१-२२-२८३६ ६५७९
**ई-मेल:** investorrelations@kokuyocamlin.com; **वेबसाइट:** www.kokuyocamlin.com

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

याद्वारे सूचित करण्यात येत आहे की कोकुयो कॅमलिन लिमिटेडच्या ('कंपनी') सभासदांची ७३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम/ई-एजीएम) ही एजीएममध्ये ('नोटीस') नमूद करण्यात आलेले कामकाज पार पाडण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे किंवा इतर ध्वनि चित्र माध्यमांद्वारे ('ओएव्हीएम') शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता (आयएसटी) घेण्यात येईल.

कोव्हिड-१९ महामारीचा प्रसार लक्षात घेता, कॉरपोरेट कामकाज मंत्रालयाने ('एमसीए') त्यांचे ८ एप्रिल २०२० तारखेचे परिपत्रक क्र.१४/२०२०, १३ एप्रिल २०२० तारखेचे क्र.१७/२०२० आणि ५ मे २०२० तारखेचे परिपत्रक क्र.२०/२०२० ('एमसीए परिपत्रके') तसेच सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') यांचे १२ मे २०२० तारखेचे परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०७९ ('सेबी परिपत्रक') यांच्या अनुरोधाने व्हीसीद्वारे किंवा ओएव्हीएमद्वारे एजीएम पार पाडण्यास अनुमती देण्यात आलेली आहे.

वित्तीय वर्ष २०१९-२० साठीच्या वार्षिक अहवालासह ('वार्षिक अहवाल') नोटीस हे दस्तऐवज कंपनीच्या सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल पत्त्यावर पाठवण्यात येईल. सभासदांनी याचीदेखील नोंद घ्यावी की नोटीस व वार्षिक अहवाल हे कंपनीच्या www.kokuyocamlin.com या वेबसाइटवर गुंतवणूकदार विभागामध्ये, स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइट्सवर म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com येथे आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com येथे आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या www.evoting.nsdl.com या वेबसाइटवर उपलब्ध असतील. सभासद हे केवळ व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएमला उपस्थित राहू शकतील आणि https://www.evoting.nsdl.com येथे थेट ई-एजीएम पाहू शकतील. ई-एजीएममध्ये सहभागी होण्यासंबंधीच्या सूचना नोटिशीमध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत गणसंख्येची मोजणी करण्याच्या हेतूसाठी व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये सहभागी झालेल्या सभासदांची गणना करण्यात येईल.

ई-मेल ॲड्रेसची नोंदणी करण्याचे/अद्ययावत करण्याचे स्वरुप: दुरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठीचे लॉगिन क्रिडेन्शल्स हे ज्या सभासदांचे ईमेल ॲड्रेस कंपनी/लिंकइनटाइम/डिपॉझिटरीज यांच्याकडे नोंदणीकृत आहेत, त्या सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेल ॲड्रेसवर पाठवण्यात येत आहेत. व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएमला उपस्थित राहण्यासाठी किंवा एजीएमदरम्यान मतदान करण्यासाठी सदर लॉगिन क्रिडेन्शल्सचा वापरही करता येऊ शकतो.

ज्या सभासदांचे ई-मेल ॲड्रेस नोंदणीकृत नाहीत, त्या सभासदांना पुढील प्रक्रियेद्वारे सदरची नोंदणी करण्याची/सदर अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येते:

१. डिमॅट स्वरुपात भागधारणा करणारे सभासद हे त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपन्टशी संपर्क साधून त्यांच्या ई-मेल ॲड्रेसची नोंदणी करू शकतात.

२. वास्तविक स्वरुपात भागधारणा करणारे सभासद हे त्यांच्या ईमेल ॲड्रेसची नोंद करण्यासाठी व इलेक्ट्रॉनिक प्रकाराद्वारे ई-मतदान सूचनेसह वार्षिक अहवाल व नोटीस प्राप्त करण्यासाठी फोलिओ क्रमांक, भागधारकाचे नाव, ईमेल ॲड्रेस, मोबाइल क्रमांक. पॅन कार्ड व आधार कार्ड यांची स्वयं साक्षांकीत प्रत आणि आणि शेअर सर्टिफिकेटची प्रत प्रदान करणाऱ्या विनंती पत्राच्या स्वाक्षरीकृत स्कॅन्ड प्रतीसह rnt.helpdesk@linkintime.co.in किंवा investorrelations@kokuyocamlin.com येथे ई-मेल विनंती पाठवून लिंकइनटाइम इंडिया प्रा.लि., रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजन्टकडे त्यांच्या ईमेल ॲड्रेसची व मोबाइल क्रमांकाची नोंद करू शकतील.

कंपनी नोटिशीमध्ये नमूद केलेल्या कामकाजावर मतदान करता येण्यासाठी सभासदांना दुरस्थ ई-मतदानाद्वारे सुविधा प्रदान करत आहे. दुरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची तपशीलवार प्रक्रिया नोटिशीमध्ये नमूद करण्यात आलेली आहे. सदर तपशील हा कंपनीच्या www.kokuycamlin.com या वेबसाइट्सवरही उपलब्ध असेल.

दुरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठीचे लॉगिन क्रिडेन्शल्स हे सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल ॲड्रेसवर ई-मेलद्वारे पाठवण्यात येतील. ज्या सभासदांनी त्यांच्या ई-मेल ॲड्रेसची नोंदणी केलेले नाही, ते सभासद नोटिशीमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करून लॉगिन क्रिडेन्शल्स तयार करू शकतील.

ज्या सभासदांनी दुरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मतदान केलेले नाही, ते सभासद ई-एजीएमदरम्यान उपलब्ध इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीमार्फत त्यांचे मतदान करण्यासाठी पात्र असतील.

सदर नोटीस ही पुर्वोक्त एमसीए परिपत्रक आणि सेबी परिपत्रक याच्या अनुपालनासह सर्व सभासदांच्या माहितीसाठी व लाभासाठी जारी करण्यात येत आहे.

**मंडळाच्या आदेशानुसार**
**कोकुयो कॅम्लिन लिमिटेड करिता**

**रविंद्र दामले**
**उपाध्यक्ष (कॉरपोरेट) आणि**
**कंपनी सचिव**

स्थळ : मुंबई
दिनांक : ९ ऑगस्ट, २०२०

(मूळ इंग्रजी मसुद्याचे हे भाषांतर असून सर्व विवादामध्ये मूळ इंग्रजी मुसदा प्रमाण मानण्यात येईल.)